
वयोवृद्धः मनोयुवा

**महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.



# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

| वर्ष-३२ | अंक-७ | किंमत : रु. ३०/- | जुलै २०२४ |
|---|---|---|---|



राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव म्हणून सौ. सुजाता सौनिक यांची नियुक्ती झाली आहे. त्या राज्यस्तरीय ज्येष्ठ नागरिक कृती समितीच्या अध्यक्ष आहेत. एक महिला राज्याच्या संपूर्ण प्रशासनाची प्रमुख म्हणून धुरा सांभाळणार आहेत याबद्दल महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) चे वतीने

**सौ. सुजाता सौनिक यांचे हार्दिक अभिनंदन.**


# नूतन आधारस्तंभ यांचे अभिनंदन



## श्री. सिध्दार्थ नेतकर

पत्ता : फ्लॅट नं. १०२, एस. के. क्लासिक अपार्टमेंट, आदर्शनगर, डी.मार्ट चे मागे, मु.पो./जि. जळगांव. ४२५ ००१.

मोबा. : ९४२२७८६२७९




## श्री. सुभाष दत्तात्रय एकांडे

पत्ता : चिटणीस चौक, मु. पो. हुपरी.

मोबा. : ८७८८७४७१३६


पद : कोषाध्यक्ष, ज्येष्ठ नागरिक संघ, हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.



## श्रीमती निलावती नेमिनाथ शेटे, ट्रस्टी
## निलावती चॅरिटेबल ट्रस्ट, द्वारा राजेश ज्वेलर्स

पत्ता : महावीर नगर, मु. पो. हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

मोबा. : ८८०५४९८७८७



विधी सेवा प्राधिकरण व फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल, सांगली यांचे वतीने कायद्याचा प्रचार व प्रसार ग्रामीण पातळीपर्यंत करणेचे दृष्टीने काढलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन मा.जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. तृप्ती धोडमिसे यांचे हस्ते करतानाचा फोटो. सोबत कौन्सिल चे प्रमुख अंजुमन खान, संपादिका चेलनादेवी खुरपे, प्रसार माध्यम अधिकारी रंगराव शिंपुकडे आणि फिरोज शेख.

सांगली विधी सेवा प्राधिकरणात भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना सचिव श्री. गिरीजेश कांबळे, अधिक्षक श्री. महेश गुर्लाहसूर, श्री. नितिन आंबेकर, कौन्सिलचे श्री. अंजुमन खान, श्री. रंगराव शिंपुकडे आणि चाँदसाहेब गवंडी.



**महाराष्ट्र शासन**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**२१८ विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**

Email ID : compcell.mhpds@gov.in

---

**क्रमांक: संकीर्ण-२०२४/प्र.क्र.८६/संगणक कक्ष** **दि. १८ जून, २०२४**

प्रति,

१) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी

२) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी

३) सर्व उपनियंत्रक शिधावाटप, मुंबई

**विषय : शुभ्र शिधापत्रिका आधार कार्डसोबत संलग्न (Aadhar Seeded) करण्याबाबत**

**संदर्भ : १) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.मफुयो २०२३/ प्र.क्र.१६०/आरोग्य ६, दि.२८.०७.२०२३**

**२) राज्य आरोग्य हमी सोसायटी(SHAS) यांचे दि.१६.५.२०२४ चे पत्र**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२६.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनांची सांगड घालून त्या राज्यात एकत्रितपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदर शासन निर्णयान्वये निर्धारित केलेल्या घटकांमध्ये दि.२८.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार लाभार्थी घटकामध्ये शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांचा देखील समावेश करण्यात आलेला आहे.

२. शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्याकरिता आयुष्यमान कार्ड निर्माण करण्यासाठी सदर शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करणे आवश्यक आहे. करिता, शुभ्र शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न (Aadhar Seeded) करण्याची कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

Signed by
Ashish Vasant Atram
Date: 18-06-2024 17:27:11
(आशिष आत्राम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -१) नियंत्रक शिधावाटप, मुंबई
२) सर्व उपायुक्त (पुरवठा)

**महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजना सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत..**

## महाराष्ट्र शासन

**महिला व बाल विकास विभाग.**

**शासन निर्णय क्रमांक- मबावि २०२४/प्र.क्र.९६/कार्या-२,**

नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:-२८ जून, २०२४.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील महिलांमध्ये ॲनिमियाचे प्रमाणे ५० पेक्षा जास्त आहे. तसेच राज्यातील श्रमबल पाहणीनुसार पुरुषांची रोजगाराची टक्केवारी ५९.१० टक्के व स्त्रीयांची टक्केवारी २८.७० टक्के इतकी आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, महिलांच्या आर्थिक, आरोग्य परिस्थितीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

महिलांचे आरोग्य व पोषण आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत. महिलांचा श्रम सहभाग पुरुषांच्या तुलनेत कमी आहे, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर परिणाम होतो. सदर परिस्थिती लक्षात घेऊन, राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजना सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**१. योजनेचा उद्देश :-**

(१) राज्यातील महिला व मुलींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे.
(२) त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे.
(३) राज्यातील महिला स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे.
(४) राज्यातील महिलांना व मुलींना सशक्तीकरणास चालना मिळणे.
(५) महिला आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा.

**२. योजनेचे स्वरुप :-** पात्रता कालावधी दरम्यान प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) सक्षम बँक खात्यात दरमहा रु.१,५००/- इतकी रक्कम दिली जाईल. तसेच केंद्र/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेव्दारे रु.१,५००/- पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेव्दारे पात्र महिलेस देण्यात येईल.

**३. योजनेचे लाभार्थी :-** महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६० या वर्ष वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला.

**४. योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता:-**

(१) लाभार्थी महिला महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक आहे.
(२) राज्यातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला.
(३) किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६० वर्ष पूर्ण होईपर्यंत.
(४) सदर योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे.
(५) लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

**५. अपात्रता :-**

(१) ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख रुपयांपेक्षा अधिक आहे.
(२) ज्याच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे.
(३) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. परंतु बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले तथा स्वयंसेवी कामगार आणि कर्मचारी अपात्र ठरणार नाहीत.
(४) सदर लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेव्दारे रु.१,५००/- पेक्षा जास्त लाभ घेतला असेल.
(५) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार/आमदार आहे.
(६) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/कॉर्पोरेशन/बोर्ड/उपक्रमाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक/सदस्य आहेत.
(७) ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संयुक्तपणे पाच एकरपेक्षा जास्त शेतजमीन आहे.
(८) ज्यांच्याकडे चारचाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहेत.

सदर योजनेच्या "पात्रता" व "अपात्रता" निकषामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्यास नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय घेवून शासन मान्यतेने कार्यवाही करण्यात येईल.

**६. सदर योजनेमध्ये लाभ मिळण्याकरिता खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत:-**

(१) योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज.
(२) लाभार्थ्याचे आधार कार्ड.
(३) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला.
(४) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य).
(५) बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.
(६) पासपोर्ट आकाराचा फोटो.
(७) रेशनकार्ड.
(८) सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

**७. लाभार्थी निवड :-** "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेच्या लाभार्थींची पात्रता अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका/मुख्यसेविका/सेतू सुविधा केंद्र/ग्रामपंचायत/ग्रामसेवक/वार्ड अधिकारी यांनी खातरजमा करुन ऑनलाईन प्रमाणित केल्यानंतर लाभार्थ्यांचा अर्ज सक्षम अधिकारी यांच्याकडे सादर करावा. सक्षम अधिकारी यांनी या कामकाजावर नियंत्रण ठेवावे. त्यानुसार सदर योजनेकरिता अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका/मुख्यसेविका/सेतू सुविधा केंद्र/ग्रामपंचायत/ग्रामसेवक/वार्ड अधिकारी व सक्षम अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यक्षेत्र | लाभार्थ्याची अर्ज स्वीकृती/तपासणी/पोर्टलवर अपलोड करणे. | अर्ज पडताळणी करुन सक्षम अधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी सादर | अंतिम मंजूरी देण्याकरीता सक्षम अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रामीण भाग | अंगणवाडी सेविका/ पर्यवेक्षिका/ सेतू सुविधा केंद्र/ग्रामपंचायत/ग्रामसेवक | संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती |
| २. | नागरी भाग | अंगणवाडी सेविका/ मुख्यसेविका/ वार्ड अधिकारी/ सेतू सुविधा केंद्र | | |

**८. नियंत्रण अधिकारी :-** आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सदर योजनेसाठी "नियंत्रण अधिकारी" राहतील. तसेच आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई हे "सहनियंत्रण अधिकारी" राहतील.

**९. योजनेची कार्यपध्दती :-**

**अ) अर्ज करण्याची प्रक्रिया** - योजनेचे अर्ज पोर्टल/मोबाइल ॲपद्वारे/सेतू सुविधा केंद्राव्दारे ऑनलाईन भरले जाऊ शकतात. त्यासाठी पुढील प्रक्रिया विहित केलेली आहे:-

(१) पात्र महिलेस या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करता येईल.

(२) ज्या महिलेस ऑनलाईन अर्ज सादर करता येत नसेल, त्याच्यासाठी "अर्ज" भरण्याची सुविधा अंगणवाडी केंद्रात/बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी/ग्रामीण/आदिवासी)/ग्रामपंचायत/वार्ड/सेतू सुविधा केंद्र येथे उपलब्ध असतील.

(३) वरील भरलेला फॉर्म अंगणवाडी केंद्रात/बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी/ग्रामीण/आदिवासी)/सेतू सुविधा केंद्र मध्ये नियुक्त कर्मचाऱ्यांद्वारे ऑनलाईन प्रविष्ट केला जाईल आणि प्रत्येक यशस्वीरित्या दाखल केलेल्या अर्जासाठी यथायोग्य पोच पावती दिली जाईल.

(४) अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया विनामूल्य असेल.

(५) अर्जदार महिलेने स्वतः उपरोक्त ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक असेल जेणेकरून तिचा थेट फोटो काढता येईल आणि E-KYC करता येईल. यासाठी महिलेने खालील माहिती आणणे आवश्यक आहे.

१. कुटुंबाचे पूर्ण ओळखपत्र (रेशनकार्ड)
२. स्वतःचे आधार कार्ड

**ब) तात्पुरत्या यादीचे प्रकाशन :-** अर्ज प्राप्त झाल्यानंतर, पात्र अर्जदारांची तात्पुरती यादी पोर्टल/ॲपवर जाहीर केली जाईल, त्याची प्रत अंगणवाडी केंद्र/ग्रामपंचायत/वॉर्ड स्तरावरील सूचना फलकावर देखील लावण्यात येईल.

**क) आक्षेपांची पावती :-** जाहीर यादीवरील हरकत पोर्टल/ॲपद्वारे प्राप्त केल्या जातील. याशिवाय अंगणवाडी सेविका/मुख्यसेविका/सेतू सुविधा केंद्र यांचेमार्फत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लेखी हरकत/तक्रार नोंदवता येईल. लेखी (ऑफलाईन) प्राप्त झालेल्या हरकत/तक्रार रजिस्टरमध्ये नोंदविल्या जातील आणि ऑनलाईन अपलोड केल्या जातील. पात्र लाभार्थी यादी जाहीर केल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसांपर्यंत सर्व हरकत/तक्रार नोंदविणे आवश्यक आहे.

सदर हरकतीचे निराकरण करण्यासाठी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली **"तक्रार निवारण समिती"** गठीत करण्यात येईल.

**ड) अंतिम यादीचे प्रकाशन :-** सदर समितीमार्फत प्राप्त हरकतीचे निराकरण करण्यात येऊन, पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार केली जाईल. सदर पात्र/अपात्र लाभार्थ्यांची स्वतंत्र यादी अंगणवाडी केंद्र/ग्रामपंचायत/वॉर्ड स्तरावर/ सेतू सुविधा केंद्र, तसेच पोर्टल/ॲपवर देखील जाहीर केली जाईल.

पात्र अंतिम यादीतील महिला मृत झाल्यास सदर महिलेचे नाव लाभार्थी यादीतून वगळण्यात येईल.

**ई) लाभाच्या रक्कमेचे वितरण:-** प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) सक्षम बँक खात्यात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत रक्कम जमा केली जाईल.

**१०. योजनेची प्रसिध्दी :-** सदर योजनेची प्रसिध्दी जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद/नोडल अधिकारी तसेच जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांनी संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या समन्वयाने करावी. तसेच, गाव पातळीवरील होणाऱ्या ग्रामसभा/ महिला सभांमध्ये सदर योजनेबाबत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

**११.** सदर योजनेसाठी वेब पोर्टल व मोबाईल ॲपलिकेशन तयार करण्याची जबाबादारी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांची राहील.

या योजनेतील लाभार्थ्यांची पोर्टलवर नोंदणी होऊन योजना सुरुळीत कार्यान्वित राहण्याकरीता तसेच पोर्टलचे संचालन, अर्ज Digitized पध्दतीने जतन करणे, पोर्टल वेळोवेळी अद्ययावत करणे याकरीता आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या स्तरावर कक्ष निर्माण करण्यास व त्यामध्ये विहीत पध्दतीने १० तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात येईल. तसेच योजना सुरुळीत कार्यान्वित राहण्याकरीता, नियंत्रण ठेवण्यासाठी शासनस्तरावर कक्ष निर्माण करुन ०५ तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात येईल.

**१२.** सदर योजनेचे संनियत्रंण व आढावा घेण्याकरिता राज्यस्तरावर समिती गठीत करण्यात येत असून सदर समितीची रचना खालीलप्रमाणे आहे:-

**<u>राज्यस्तर समिती:-</u>**

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १ | आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २ | आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई | सदस्य |
| ३ | सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | सह सचिव/उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५ | सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास | सदस्य |
| ६ | सर्व उप आयुक्त (विकास), ग्राम विकास विभाग | सदस्य |
| ७ | संचालक, नगरपालिका, नगरपंचायत प्रशासन, नवी मुंबई | सदस्य |
| ८ | उप आयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास, आयुक्तालय, पुणे | सदस्य सचिव |

सदर समितीची बैठक ३ महिन्यातून एक वेळेस तसेच आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात यावी. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

(१) सदर योजनेची देखरेख व संनियंत्रण करणे.
(२) राज्यातील योजनेचा अंमलबजावणीबाबत आढावा घेणे.
(३) सदर योजनेसाठी उपलब्ध तरतूद व खर्च याबाबतचा आढावा घेवून आवश्यक निधीची मागणी शासनास सादर करणे.
(४) सदर योजनेत धोरणात्मक बदल करावयाचा असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे.

**जिल्हास्तर समिती:-**

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | संबंधित सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सह अध्यक्ष |
| ३ | संबंधित पोलिस अधिक्षक | सदस्य |
| ४ | जिल्हा सह आयुक्त नगर प्रशासन | सदस्य |
| ५ | जिल्हयातील महानगरपालिकाचे आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी (उप आयुक्त दर्जापेक्षा कमी नसावे.) | सदस्य |
| ६ | संबंधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी | सदस्य |
| ७ | जिल्हयातील नगरपरिषदांचे मुख्याधिकारी | सदस्य |
| ८ | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प | सदस्य |
| ९ | संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य सचिव |

सदर समितीची बैठक दरमहा तसेच आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात यावी. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

(१) सदर योजनेची देखरेख व संनियंत्रण करणे.
(२) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत नियमित आढावा घेणे.
(३) सदर योजनेसाठी उपलब्ध तरतूद व खर्च याबाबतचा आढावा घेवून आवश्यक निधीची मागणी राज्यस्तरीय समितीकडे सादर करणे.
(४) कालबध्द पध्दतीने पात्र लाभार्थीची यादी अंतिम करणे व सदर योजनेपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेणे.

राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समितीमध्ये तसेच योजनेच्या अंमलबजावणी सुकर व्हावी, यासाठी कार्यपध्दतीमध्ये बदल करण्याचे अधिकार मा.मंत्री, महिला व बाल विकास यांना राहतील. तसेच मा.मंत्री, महिला व बाल विकास यांच्याकडून सदर योजनेचा आढावा दर ३ महिन्यांनी घेण्यात येईल.

**१३.** सदर योजनेचे मुल्यांकन महात्मा गांधी प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत करण्यात येईल.

**१४. योजनेच्या अंमलबजावणीसाठी कालमर्यादाः-**

| अ.क्र. | उपक्रम | वेळेची मर्यादा |
|---|---|---|
| १ | अर्ज प्राप्त करण्यास सुरुवात | १ जुलै, २०२४ |
| २ | अर्ज प्राप्त करण्याचा शेवटचा दिनांक | १५ जुलै, २०२४ |
| ३ | तात्पुरती यादी प्रकाशन दिनांक | १६ जुलै, २०२४ |
| ४ | तात्पुरत्या यादीवरील तक्रार/हरकती प्राप्त करण्याचा कालावधी | १६ जुलै, २०२४ ते २० जुलै, २०२४ |
| ५ | तक्रार/हरकतींचे निराकरण करण्याचा कालावधी | २१ जुलै, २०२४ ते ३० जुलै, २०२४ |
| ६ | अंतिम यादी प्रकाशन दिनांक | ०१ ऑगस्ट, २०२४ |
| ७ | लाभार्थ्यांचे बँकेमध्ये E-KYC करणे. | १० ऑगस्ट, २०२४ |
| ८ | लाभार्थी निधी हस्तांतरण | १४ ऑगस्ट, २०२४ |
| ९ | त्यानंतरच्या महिन्यांत देय दिनांक | प्रत्येक महिनाच्या १५ तारखेपर्यंत |

उपरोक्त कालावधीनंतर या मोहिमेतंर्गत नोंदणीबाबतच्या कार्यवाहीसंदर्भात वेळोवेळी आवश्यक त्या सूचना देण्यात येतील.

२. सदर योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता भासल्यास नवीन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

३. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी “मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष” यांचे सहकार्य घेण्यात येईल.

४. सदर योजनेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उपलब्ध होईपर्यंत या विभागाच्या “लेक लाडकी” या योजनेसाठी अस्तित्वात असलेल्या लेखाशिर्ष २२३५ डी५२४ मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या आर्थिक तरतूदीतून खर्च भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय दि.२८.०६.२०२४ रोजीच्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.


६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०६२८१८१४०१८२३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.अनुपकुमार यादव)
सचिव, महाराष्ट्र शासन



पाऊले चालती
पंढरीची वाट..



दि. १७ जुलै -
आषाढी
एकादशीच्या
सर्व ज्येष्ठ
नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा..!

## ज्येष्ठ नागरिक राज्यस्तरीय कृतज्ञता सन्मान


यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने १ ऑक्टोबर या जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक राज्यस्तरीय कृतज्ञता सन्मान सुरू करण्यात आले आहेत. दिनांक ३० जून २०२४ ते २६ ऑगस्ट २०२४ पर्यंत दिलेल्या पत्त्यावर अर्ज करण्यात यावा.

आपल्या कार्यकर्तृत्वातून सेवानिवृत्त झाल्यानंतर, आपल्या अनुभवाच्या जोरावर समाजाभिमुख कार्य करणारे अनेक ज्येष्ठ नागरिक आहेत. जे कोणत्याही स्वार्थाशिवाय कार्य करीत आहेत. त्यांचा यथोचित मान सन्मान व्हावा हा या सन्मानाचा उद्देश आहे.

या सन्मानासाठी दोन महिला, दोन पुरुष, एक ट्रान्सजेंडर किंवा दिव्यांग व्यक्ती यांची निवड करण्यात येईल. सन्मानाचे स्वरूप मानपत्र, सन्मान चिन्ह आणि सन्मानाची रक्कम असे आहे. हा सन्मान सोहळा दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न होईल.

अर्ज डाउनलोड करण्यासाठी
https://chavancentre.org/.../invitation-to-apply-for... या लिंकला भेट द्यावी.

अधिक माहितीसाठी संपर्क –
मनीषा खिल्लारे – ९०२२७१६९१३




## योगा शेतकऱ्यांचा

अडलेल्या अन् नडलेल्या
कामांसाठी सलाम केले
तेच त्यांचे
सूर्यनमस्कार झाले.


कर्जापाई अल्पशा
धनकोसमोर वाकत गेले
तेच त्यांचे
वक्रासन झाले.

पोटाचे अन्न दात्याच्या
जेव्हा खपाट झाले
तेच त्यांचे
कपालभाती झाले.

यानेही धुडकावले
अन् त्याने् ही धुडकावले
तेच त्यांचे
अनुलोम विलोम झाले.

वैतागून कर्जाला
तिरडीस जवळ केले
तेच त्यांचे
शवासन झाले.

– नारायण अंधारे, शिर्ला (अंधारे)
७३८७२७७१२०



क्र.मपविम/ आरक्षण/ ज्ये. ना. सवलत/ २०२४ /५३०९

दिनांक: [illegible]

पुन: सुधारीत परिपत्रक – २

संदर्भ :- परिपत्रक क्र. मपविम/ नि.का./ज्ये.नागरीक/सवलत/२०२२ दि.२२/०२/२०२३

सुधारीत परिपत्रक क्र. मपविम/नि.का/६३५३/सवलत/२०२३/५०४५ दि.२६/११/२०२३

पुन:सुधारीत परिपत्रक क्र.मपविम/आरक्षण नि.का/ज्ये.ना.स./२०२४/४०८० दि.२५/०६/२०२४

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने ज्येष्ठ नागरिकांचे निवृत्ती नंतरचे आयुष्य आनंददायी होण्याकरिता त्यांच्या पर्यटक निवासातील सर्व प्रकारच्या खोल्यांच्या दरावर सवलत जाहीर करण्यात येत आहे. या सवलतीस वय [illegible]र्षे व त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिक पात्र असतील. ज्येष्ठ नागरिकांना पुढील अटी शर्ती नुसार सवलत उपलब्ध करण्यात :-

१) ज्येष्ठ नागरिकांना निवासातील सर्व प्रकारच्या खोल्यांवर २०% सवलत देण्यात येईल.

२) ज्येष्ठ नागरिकांना खोल्यांवर सवलत फक्त सोमवार ते गुरूवार या कालावधीत देण्यात येईल.

३) ऑनलाईन आरक्षण, एजंट आरक्षण, महामंडळाची कार्यालये तसेच माहिती केंद्र येथे आरक्षण उपलब्ध होईल.

४) एका ज्येष्ठ नागरिकाला फक्त एकच रुम आरक्षित करता येईल.

५) ज्या ज्येष्ठ नागरिकांच्या नावे आरक्षण करण्यात आले आहे ती व्यक्ती पर्यटक निवासात उपस्थित असणे आवश्यक आहे.

६) ज्येष्ठ नागरिक काही कारणास्तव आरक्षित केलेल्या पर्यटक निवासात जाऊ शकत नसतील तर त्यांच्या कुटुंबातीलच आरक्षणाचा उपभोग घेत असलेल्या व्यक्तीने आरक्षण फरकाची रक्कम अदा करणे गरजेचे आहे.

७) ज्यांनी ज्येष्ठ नागरिक सवलतीचे आरक्षण केले असेल परंतु उपरोक्त अटी व शर्तीची पुर्तता होत नसेल तर त्यांना फरकाची रक्कम पर्यटक निवासात जमा करणे आवश्यक आहे.

८) ज्येष्ठ नागरिकांना वयाचा दाखला उदा. ज्येष्ठ नागरिक ओळख पत्र, वाहनचालक परवाना, पासपोर्ट, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र व पॅन कार्ड आपैकी एक पुरावा निवास व्यवस्थापक यांना सादर करणे अनिवार्य आहे.

९) ही सवलत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ स्वत: चालवत असलेल्या पुढील पर्यटन निवासासाठी अनुज्ञेय असेल:

१. प. नि. गणपतीपुळे

२. प. नि. अजिंठा फर्दापुर

३. प. नि. महाबळेश्वर

४. प. नि. भंडारदरा

५. प. नि. माथेरान

६. प. नि. माळशेज घाट

७. प. नि. हरिहरेश्वर
८. प. नि. चिखलदरा
९. प. नि. तारकर्ली
१०. प. नि. पानशेत
११. तारकर्ली हाऊस बोट
१२. प. नि. हॉटेल पिलग्रीम्स इन शिर्डी
१३. प. नि. ताडोबा
१४. प. नि. कार्ला
१५. प. नि. घृष्णेश्वर
१६. प. नि. नागपूर
१७. प. नि. अजिंठा टी जंक्शन
१८. प. नि. कुणकेश्वर
१९. प. नि. वर्धा
२०. प. नि. बोधलकसा
२१. एलिफंटा

व्यवस्थापकीय संचालक
मपविम, मुंबई

प्रत,

१) मा. मंत्री महोदय, पर्यटन व रोहयो, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांचे स्वीय सहाय्यक यांच्या माहिती करीता.
२) मा. राज्यमंत्री महोदय, पर्यटन, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांचे स्वीय सहाय्यक यांच्या माहिती करीता.
३) मा. मुख्यसचिव महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांच्या माहिती करीता.
४) मा. प्रधान सचिव, पर्यटन विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या माहिती करीता.
५) मा. व्यवस्थापकीय संचालक/ सह. व्यवस्थापकीय संचालक / महाव्यवस्थापक मपविम मुंबई यांचे स्वीय सहाय्यक यांच्या माहिती करीता.
६) उपमहाव्यवस्थापक, मपविम मुंबई यांच्या माहिती करीता.
७) कार्यकारी अभियंता १ व २, प्रधान कार्यालय, मपविम. मुंबई यांच्या माहिती करिता.
८) सर्व विभागप्रमुख, प्रधान कार्यालय, मपविम, मुंबई यांच्या माहिती करिता.
९) सर्व वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक/ प्रादेशिक व्यवस्थापक, मपविम प्रादेशिक कार्यालय यांच्या माहिती करिता.
१०) वरिष्ठ व्यवस्थापक माहिती व तंत्रज्ञान प्रधान कार्यालय, मपविम, मुंबई यांनी सदरची माहिती महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी करण्या करिता.
११) प्रकल्प अधिकारी, प्रकल्प कार्यालय, ओरस सिन्धुदुर्ग यांच्या माहिती करिता.
१२) कंपनी सचिव प्रधान कार्यालय, मपविम, मुंबई यांच्या माहिती करिता.
१३) सर्व पर्यटक निवास व्यवस्थापक, मपविम यांच्या माहिती करिता.
१४) सर्व माहिती व आरक्षण केंद्र, मपविम यांच्या माहिती करिता.
१५) इंडियन इंस्टिट्यूट ऑफ स्कुबा डायव्हिंग अँड एक्वाटिक स्पोर्ट्स, तारकर्ली.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
दुसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई 400032

दूरध्वनी व फॅक्स क्र.022 22024869
E-mail Id: home_pol13@maharashtra.gov.in

---

क्रमांक : 639358/H.D.-58020/6/2023-POL13-MHD-Home Department
दिनांक : 10 जुलै, 2023.

प्रति,
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- ज्येष्ठ नागरिकांचे धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत...
संदर्भ :- 1) सार्वजनिक आरोग्य विभागाचे क्रमांक बैठक 2023/प्र.क्र. 139/ आरोग्य 3-अ, दिनांक 19.06.2023 रोजीचे पत्र.
2) पोलीस महासंचालक कार्यालयाचे क्रमांक DGP/20/195/Community Policing Scheme/177/2019, दिनांक 15.06.2019 रोजीचे स्थायी आदेश.

उपरोक्त विषयावरील संदर्भ क्रमांक 1 येथील पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

2. मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. १७.०५.२०२३ रोजी सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मुख्य कार्यकारी संदर्भ क्रमांक 1 येथे ... पत्रान्वये पाठविण्यात आले आहे. सदर बैठकीमध्ये ज्येष्ठ नागरिकांवरील सध्याच्या होत असलेले कौटुंबिक, सामाजिक ... लक्षात घेऊन ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षासाठी प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष स्थापन करावे ... मुद्याच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत :-

*"याबाबत संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनेतील एक ज्येष्ठ नागरिकांच्या अध्यक्षतेखाली व संबंधित पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्यांची एक समिती गठीत करण्यात यावी. ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष स्थापन करण्यात यावा व याबाबत आवश्यक परिपत्रक निर्गमित करावे."*

3. उपरोक्त मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशास अनुसरून कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक 2 येथे नमूद आपल्या दिनांक 15.06.2019 रोजीच्या स्थायी आदेशानुसार ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्याबाबत दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी सर्व पोलीस स्टेशनमध्ये करण्याबाबत सर्व पोलीस घटकांना सूचित करण्यात यावे. तसेच, संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनेतील एक ज्येष्ठ नागरिकांच्या अध्यक्षतेखाली व संबंधित पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्यांची एक समिती गठीत करण्याच्या अनुषंगाने राज्यातील सर्व पोलीस घटकांना सूचना देण्याबाबत आपल्या स्तरावरून आवश्यक आदेश निर्गमित करण्यात यावेत व त्याची एक प्रत शासनास उपलब्ध करून द्यावी, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

Signed by Hemantkumar
Kisan Mohan
Date: 10-07-2023 17:51:11

(हेमंतकुमार कि.मोहन)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, निवड नस्ती, पोल-13, गृह विभाग.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल, सांगली

# "ज्येष्ठांनो जगा उर्वरित जीवन आनंदाचे मिळाले आता संरक्षण कायद्याचे"

## आई वडील व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ (नियम १०)

- शासनाच्या या कायद्याचा मातापिता व ज्येष्ठ नागरिकांना आधार.
- मातापिता व ज्येष्ठ नागरिकांना सांभाळणेची संपूर्ण जबाबदारी पाल्यावर.
- मातापिता अगर ज्येष्ठ नागरिक यांची स्वकष्टार्जित अगर वारसाहक्काने मालमत्ता ज्याचेकडे (नातेवाईक सुध्दा) जाईल त्यांचेवर सांभाळणेची जबाबदारी.
- मातापिता व ज्येष्ठांना अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार इ. पुरविणेची जबाबदारी पाल्यांवर.
- मुले (पाल्य) या संज्ञेत पुत्र, कन्या, नात, नातु (अज्ञानाखेरीज) यांचा समावेश.
- आईवडील या संज्ञेत जन्म देणारे मातापिता, दत्तक मातापिता, सावत्र मातापिता यांचा समावेश, **ते ज्येष्ठ नागरिक असोत वा नसोत.**
- मातापिता अगर ज्येष्ठ नागरिक हे त्यांचा योग्य रित्या सांभाळ न करणाऱ्या अगर दुर्लक्ष करणाऱ्या पाल्याविरुध्द/नातेवाईकाविरुध्द निर्वाह प्राप्तीसाठी अर्ज दाखल करणेस हक्कदार.
- या कायद्याअंतर्गत विभागीय प्राधिकरण (उपविभागीय अधिकारी (महसुल)) यांचेकडे न्यायाधिकरण म्हणून अधिकार.

ज्येष्ठ नागरिकांनो, आपले उर्वरित आयुष्य आनंदाने आणि आरोग्यदायी व्यतीत करा. आपला छळ होत असेल, आपला योग्यरित्या सांभाळ (अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार इ.) होत नसेल तर या कायद्याचा आधार घ्या व बिनधास्त जगा.

### प्राधिकरणाचे अधिकार

- पीडित मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांना घटनेनुसार जगण्याचा हक्क मिळवून देणे.
- पीडित मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांना पाल्य/नातेवाईक यांचेकडून मासिक निर्वाह भत्ता मिळवून देणे.
- मासिक निर्वाह भत्ता जास्तीत जास्त रु. १0,000/-.
- न्यायाधिकरणाचे आदेशानुसार मंजूर निर्वाह भत्ता मातापिता/ज्येष्ठ नागरिक यांचे खात्यावर दरमहा जमा करणेची जबाबदारी संबंधित पाल्य अगर नातेवाईक यांची.
- न्यायाधिकरणाचे आदेशानुसार पाल्याने/नातेवाईकाने निर्वाह भत्त्याची रक्कम संबंधितांचे खात्यावर जमा न केलेस शिक्षेची तरतूद.
- ज्येष्ठ नागरिकांना वाऱ्यावर सोडणारी व्यक्ती कारावास आणि/किंवा द्रव्यदंडास पात्र.
- मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांना त्यांनी हयातीत हस्तांतर केलेली मालमत्ता परत घेणेचा अधिकार.
- पाल्य (मुले) आपला योग्यरित्या सांभाळ करीत नसतील तर प्राधिकरण (उपविभागीय अधिकारी (महसुल)) यांचेकडे तक्रार अर्ज दाखल करणेचा माता-पित्यांना हक्क.

**उर्वरित सुखी व निरामय आयुष्यासाठी व अधिक मार्गदर्शनासाठी संपर्क साधा...**

१) जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (दिवाणी न्यायालय), सांगली. २) तालुका विधी समिती (तालुका न्यायालय)
३) आपल्या विभागाचे उपविभागीय अधिकारी (महसुल)
४) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, जुना बुधगांव रस्ता, सांगली.
५) फेस्कॉम उपाध्यक्ष तथा प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल, अ/७, सुभाषनगर - ४१६ ४३७. (मोबा. ९४२२५८३००४)

**सौजन्य :**

(१) अंजुमन खान (फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख), (२) श्रीमती चेलनादेवी खुरपे (संपादिका), (३) मोहन कांबळे (सचिव), (४) चाँदसाहेब गवंडी (कोषाध्यक्ष), (५) रंगराव शिंपुकडे (प्रसार माध्यम अधिकारी), (६) सुधीर नाईक (सामाजिक कार्यकर्ते), (७) सौ. मंजुळा श्रीमंत साळे (सदस्या, ग्रा.पं.वासुंबे), (८) अब्दुल लतीफ बाबूलाल शेख (अध्यक्ष, ज्ये.ना.स.), (९) एसके इन्व्हेस्टमेंट, मिरज, (१०) आधार ज्येष्ठ नागरिक संस्था, सुभाषनगर (मिरज), (११) आधार ज्येष्ठ नागरिक संघ, गव्हर्मेंट कॉलनी, मिरज.

Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2024-2026




पूणे येथे ज्येष्ठ नागरिकांचे शिबिराप्रसंगी मा. शेखर गायकवाड (निवृत्त आय.ए.एस. जिल्हाधिकारी), अति.जिल्हाधिकारी मा.प्रल्हाद कचरे, निवृत्त उप जिल्हधिकारी मा. डॉ. संजय कुंडेटकर यांचे समवेत अंजुमन खान आणि इतर मान्यवर.

**महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई यांचे वतीने**




९ जुलै



**श्री. अशोक वसंतराव कुलकर्णी (कोल्हापूर)**

मोबा. ९४२३८५९९४७

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :

श्री. अंजुमन खान

फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

**PRINTED MATTER**

प्रति,

____________________

____________________

____________________